झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स -II, सेनापती बापट रोड, पुणे-१६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोनिआ/४८८/२०२५
दिनांक : ०६/०३/२०२५.

# झोपडपट्टी निर्मूलन आदेश

(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (ड) सह कलम १२ अन्वये)

प्रस्तावना -

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद सि.स.नं.४६९४पै., ४६९६पै., ४७०४पै., ४७०५पै., ४७०६पै., ४७०७पै., ४७१०पै., ४७११, ४७१२पै., ४७१३पै.,४७१४पै., ४७२३पै., ४७४०पै. व ४७३९पै., इंदिरा नगर, चिंचवड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ २६१२१.६६ चौ.मी. असून महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे मालकीच्या सदर जागेवर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. साईचंद्र एस.आर.ए.प्रोजेक्ट प्रा.लि. यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी अधिनियमाच्या कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करण्याबाबत दि.२५/११/२०२२ रोजी आदेश पारित केले आहेत व सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील विकास नियंत्रण नियमावली, २०२२ यातील नियम क्र. १४.६.१२ (१) च्या तरतुदीनुसार प्रशासकीय मान्यता दि.२६/०४/२०२३ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आली आहे.

(३) सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करुन दि.१६/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे आणि, उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण ११४४ झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र ७९१, अपात्र २८४ व बिगर निवासी पात्र -२, अपात्र २२, या प्रमाणे एकुण ७९४ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत;

(४) सदर मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करणारा अंतिम आदेश दि.२५/११/२०२२ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, डिसेंबर १५-२१, २०२२ पृष्ठ मध्ये क्र. ४,५ व ६ तसेच प्रभात व नवभारत या वृत्तपत्रात दि.०९/१२/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे.

(५) उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणा-या अंतिम आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३(ड) सह कलम १२ (१) अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

(६) विकसक मे. साईचंद्र एस.आर.ए. प्रोजेक्ट प्रा.लि. यांचेमार्फत उपरोक्त मिळकतीवरील झोपडीधारकांची योजनाक्षेत्रात बांधकाम होईपर्यंतच्या कालावधीसाठी संक्रमण व्यवस्था उपलब्ध करणे त्यांचेवर बंधनकारक असल्याचे दि.१७/०२/२०२५ रोजीचे हमीपत्रान्वये मान्य केले आहे. यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नगररचना विभागाने संक्रमण व्यवस्थेसाठी प्रति पात्र झोपडीधारक प्रति माह रू.५३८३-/- इतके निवासी सदनिकेकरीता व रु.३६०३/- इतके बिगरनिवासी गाळयासाठी किमान भाडे निर्धारित केले असून प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.१०, दि.१२/१२/२०२३ व शुद्धिपत्रक क्र.१, दि.१४/०२/२०२५ नुसार निष्कासनापुर्वी एक वर्षाचे भाडे अग्रीम स्वरुपात व त्यानंतर पुनर्वसन सदनिकेचा ताबा देईपर्यत प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस पुढील-एक वर्षाचे आगावू भाडे सर्व पात्र झोपडीधारकांना विकसकाने अदा करणे अनिवार्य आहे.

(७) झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व विकास नियंत्रण नियमावलीतील सर्व तरतूदींची पूर्तता करण्याच्या आधीन राहून योजनेअंतर्गत पुढील कामकाज पार पाडणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाल्याने व अधिनियमांतर्गत अशी कार्यवाही करण्यास सक्षम असल्याने मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३ ड सह कलम १२ (१) नुसार खालीलप्रमाणे झोपडपट्टी निर्मूलन आदेश पारित करत आहे.

आदेश :-

(१) खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

(२) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसक यांचे ताब्यात द्यावी.

(३) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन मोकळी करावी व संक्रमण व्यवस्थेसंदर्भातील अन्य निवासी व्यवस्थेचा विकल्प निवडून तात्काळ स्थलांतरित व्हावे.

(४) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यास राहतील.

(५) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा

झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३इ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

(६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव : इंदिरा नगर, चिंचवड पुणे सि.स.नं.४६९४ पै, ४६९६ पै, ४७०४ पै, ४७०५ पै, ४७०६ पै, ४७०७ पै, ४७१० पै, ४७११, ४७१२ पै, ४७१३ पै,४७१४ पै, ४७२३ पै, ४७४० पै व ४७३९ पै,
महानगरपालिका क्षेत्र : पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव - इंदिरा नगर, चिंचवड | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सि.स.नं. | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमीती पद्धतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार) | योजना क्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ४६९४ पै.,४६९६ पै., ४७०४ पै.,४७०५ पै., ४७०६ पै.,४७०७ पै., ४७१० पै., ४७११, ४७१२ पै.,४७१३ पै., ४७१४ पै. ४७२३ पै. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे | एकूण क्षेत्र २६१२१.६६ चौ.मी. (उपरोक्त क्षेत्रात DP मध्ये नमूद ओपन स्पेसचे ३२३०.६८ चौ.मी. व MIDC च्या रस्त्याचे ४४०२.४२ चौ.मी. क्षेत्र समाविष्ट आहे) | सि.स.नं. ४७२३ | सि.स.नं. ४७४४, सि.स.नं. ४७४५, सि.स.नं. ४७३७, सि.स.नं. ४७३६. | सि.स.नं. ४६९३, सि.स.नं. ४६९४ पै., सि.स.नं. ४७४० | सि.स.नं. ४६९५, सि.स.नं. ४६९६, सि.स.नं. ४७०८, सि.स.नं. ४७०९. |
| ४७४०पै., ४७३९पै. | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | | | | | |

सदर चा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- ०६/०३/२०२५.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

(नीलेश र. गटणे) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव सादर -
१. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.

प्रत कार्यवाहीस्तव अग्रेषीत -
१. मा. आयुक्त, पिंपरी - चिंचवड महानगरपालिका, पुणे.
२. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्को रोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे -४११०१९.
३. मे.साईचंद्र, एस.आर.ए. प्रोजेक्टस प्रा.लि., स.नं.१०१/१६, उदय सोसायटी, एरंडवणा, पुणे-४११००४.
४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.